६) **दिव्यांग व्यक्तींना उदरनिवार्ह साठी व्यवसायाकरीता साहित्य खरेदीसाठी अनुदान –**

| | |
|---|---|
| **योजनेचा उद्देश -** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दिव्यांग व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आवश्यक असलेल्या साहित्या साठी अनुदान उपलब्ध करुन देण्यात येईल. (प्रति लाभार्थी रु.२०,०००/- प्रमाणे) |
| **साहित्य :-** | शिलाई मशिन (मोटारसहित), घरघंटी मशिन, डिपफ्रिजर, सॉफ्टी आईस्क्रीम मशिन, शितपेय ठेवण्यासाठीचे फ्रिज इ. |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) ४० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याचा (सिव्हिल हॉस्पिटल/अलीआवर जंग/जे.जे.हॉस्पिटलचा दाखला) दाखला<br>२) महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी ५ वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा म्हणुन पॅनकार्ड, रेशनकार्ड, लाईट बील, टॅक्सपावती, जन्मदाखला, ॲग्रीमेंट छायांकित प्रत सादर करणे.<br>३) आधार कार्डची छायांकित प्रत.<br>४) शिधापत्रिकेची छायांकित प्रत<br>५) सदर योजना एक वर्षापर्यंत राहील व मुदतवाढीचा निर्णय समिती घेईल. |

७) **दिव्यांग व्यक्तीसाठी क्रीडा, चित्रकला, हस्तकला इ. स्पर्धा आयोजित करणे.**

८) **दिव्यांगाच्या लग्नासाठी अर्थसहाय्य करणे** :-

| | |
|---|---|
| **योजनेचा उद्देश -** | मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये राहणाऱ्या दिव्यांग व अव्यंग विवाहितांना लग्नासाठी रु.२५,०००/- अर्थसहाय्य करणेबाबत. |
| **कार्यक्षेत्र** | मिरा-भाईंदर महानगरपालिका |
| **योजनेच्या अटीशर्ती** | १) वधू अथवा वराकडे दिव्यांग व्यक्ती अधिनियमाप्रमाणे किमान ६० % व त्यापेक्षा जास्त अपंगत्वाचे सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले प्रमाणपत्र असावे. (सिव्हिल हॉस्पिटल/ अलीआवर जंग/ जे.जे.हॉस्पिटलचा दाखला.)<br>२) दिव्यांग वधू किंवा वर यापैकी एक महानगरपालिका क्षेत्रामध्ये कमीत कमी ५ वर्ष राहत असलेबाबतचा वास्तव्याचा पुरावा म्हणुन रेशनकार्ड, लाईट बील, टॅक्सपावती, जन्मदाखला, ॲग्रीमेंट छायांकित प्रत सादर करणे.<br>३) विवाहित वधू व वराचा प्रथम विवाह असावा, वधू अथवा वर घटस्फोटीत असल्यास अशा प्रकारची मदत यापूर्वी घेतलेली |

| | |
|---|---|
| | नसावी या दोन्ही बाबतीत प्रतिज्ञापत्र दयावे.<br>४) विवाह हा कायदेशीररित्या विवाह नोंदणी कार्यालयाकडे नोंदविलेला असावा.<br>५) विवाह झाल्यानंतर किमान एका वर्षाच्या आत त्यांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी संबंधीत समाजकल्याण अधिकारी यांचेकडे अर्ज करणे आवश्यक आहे.<br>६) शिधापत्रिकेची छायांकित प्रत.<br>७) आधारकार्ड, पॅनकार्डची छायांकित प्रत. |

**९) दिव्यांग मुलांसाठी शाळा:-**

**योजनेचा उद्देश -** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये दिव्यांग मुलांसाठी शाळा

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

**योजना राबविणेसाठी आवश्यक अधिकारी तसेच कर्मचारी** सदर योजने अंतर्गत मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात राहणाऱ्या दिव्यांग मुलांसाठी शाळा सुरु करावयाची असुन असुन सदर शाळेसाठी खालीलप्रमाणे अधिकारी तसेच कर्मचारी आवश्यक आहेत.

१) मुख्याध्यापक - ०१

२) मनोचिकित्सक - आवश्यकतेनुसार

३) शिक्षक - आवश्यकतेनुसार

४) लिपिक - आवश्यकतेनुसार

५) दिव्यांग मुलांची काळजी घेण्यासाठी काळजीवाहक – आवश्यकतेनुसार

६) शिपाई - आवश्यकतेनुसार

**१०) दिव्यांग व्यक्तींचे सर्व्हेक्षण करणे:-**

**योजनेचा उद्देश -** मिरा-भाईंदर महानगरपालिका क्षेत्रामध्ये राहणाऱ्या दिव्यांग व्यक्तींची ऑनलाईन नोंदणी करणे.

**कार्यक्षेत्र** मिरा-भाईंदर महानगरपालिका

दिव्यांग व्यक्तींची नोंदणी करण्यासाठी सॉफ्टवेअर खरेदी करणेबाबत.